# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी : २२७९४२१६

क्रमांक: टिआरएन-२०१६/प्र.क्र.५८/सीपीटीपी
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२/०३/२०१७

प्रति,

१ सह सचिव/उप सचिव (१४-अ कार्यासन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ पोलीस उप अधिक्षक गट-अ / सहायक पोलीस आयुक्त गट-अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क गट-ब), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

४ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ उप मुख्य कार्यकारी अधिकारी गट विकास अधिकारी गट-अ), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई-१

५ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ सहायक गट विकास अधिकारी गट-ब), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई-१

६ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ उप जिल्हाधिकारी गट-अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

७ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ तहसिलदार गट-अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

८ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ नायब तहसिलदार गट-ब), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

९ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ उप अधिक्षक भूमी अभिलेख गट-ब), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१० सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ सहायक विक्रिकर आयुक्त गट-अ), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ सहायक संचालक, गट-अ]), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१२ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ सहायक निबंधक सहकारी संस्था गट ब), सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१३ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी गट-अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१४ सह सचिव/उप सचिव (आस्थापना/ सहायक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क गट-ब), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय :- एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम - २०१५**
जिल्हा संलग्नता प्रशिक्षण टप्प्यादरम्यान घेण्यात येणाऱ्या परीक्षेबाबत

महोदय,

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. **टिआरएन-१११४/प्र.क्र.८४/१८-ब, दि. २२/०४/२०१५** अन्वये जिल्हा संलग्नता प्रशिक्षण टप्प्यादरम्यान ४० गुणांची लेखी परीक्षा व १० गुणाचे विभागीय नियंत्रक अधिकाऱ्याद्वारे मूल्यमापन निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानंतर सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, **क्रमांक. टिआरएन-०२१६/प्र.क्र.५८/सीपीटीपी, दि. ०४/०१/२०१७**

व शासन शुध्दीपत्रक, क्रमांक **टिआरएन-०२१६/प्र.क्र.५८/सीपीटीपी, दि. ०९/०३/२०१७** नुसार जिल्हा संलग्नता प्रशिक्षण टप्प्यादरम्यान ४० गुणांची लेखी परीक्षा व १० गुणाचे विभागीय नियंत्रक अधिकाऱ्याद्वारे मूल्यमापन रद्द करुन सीपीटीपी-३ च्या तुकडीपासून जिल्हा संलग्नता प्रशिक्षण टप्प्यादरम्यान प्रकल्प अहवालासाठी ३० गुण व त्याच्या सादरीकरणासाठी १० गुण तसेच प्रशासकीय विभागामार्फत १० गुणांचे मूल्यमापन अशा प्रकारे एकूण ५० गुणांचे मुल्यमापन निश्चित करण्यात आलेले आहे .

तथापी सीपीटीपी-२ च्या तुकडीकरिता साप्रवि, शासन निर्णय, दि. २२/०४/२०१५ अनुसार जिल्हा स्तरावरील प्रशिक्षणदरम्यान ४० गुणांची लेखी परीक्षा व १० गुणांचे विभागाच्या नियंत्रक अधिकाऱ्यांद्वारे होणारे मुल्यमापन असे एकूण ५० गुणांचे गट-अ व ब पदांच्या संवर्गाशी संबंधित विभागाद्वारे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत सीपीटीपी २ च्या तुकडीचे पुनर्विलोकन व उजळणी प्रशिक्षण सुरु आहे. तथापि सदर तुकडीचे जिल्हा संलग्नता प्रशिक्षण टप्प्यादरम्यान झालेल्या परीक्षेचे ५० गुणांचे मूल्यमापन अहवाल यशदा, पुणे व वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस प्राप्त झालेले नसल्याने सदर परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचे पुनर्विलोकन व उजळणी प्रशिक्षणानंतरचे एकूण २०० गुणांचे मुल्यमापन करतांना संबंधति प्रशिक्षण संस्थांना अडचणी येत आहेत.

राज्य सेवा मुख्य परीक्षा व मुलाखतीतील एकूण गुण तसेच पुनर्विलोकन व उजळणी प्रशिक्षणानंतर संबंधित प्रशिक्षणार्थींना प्राप्त होणारे गुण यांची एकत्रित बेरीज करुन त्याआधारे संबंधित प्रशिक्षणार्थींची सेवाज्येष्ठता निश्चित करण्याची कार्यवाही शीघ्रतेने करावी लागणार आहे, ही बाब विचारात घेता, सीपीटीपी-२ च्या तुकडीमधील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचे जिल्हा संलग्नता प्रशिक्षण टप्प्यादरम्यान झालेल्या ५० गुणांच्या परीक्षेचे मूल्यमापन अहवाल यशदा, पुणे व वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेकडे तातडीने पाठविण्यात यावेत, जेणेकरुन पुनर्विलोकन व उजळणी प्रशिक्षणानंतर होणारे एकूण २०० गुणांचे मूल्यमापन करताना संबंधित प्रशिक्षण संस्थांना अडचणी येणार नाहीत .

आपला,

(अजित देशमुख)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रतिलीपी-

१. महासंचालक,यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-४११ ००७
२. संचालक,वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, नागपूर-४४२ ०४१०